# The Maharashtra Urban Co-operative Banks' Federation Ltd.

(Regd. No. : BOM - GNL - 8 of 9th March 1979)

Bharatiya Krida Mandir, 4th Floor, Wadala, Mumbai - 400 031. P.B. No. 7120 • Tel.: 2413 5797 • Fax : 2415 1185
• E-Mail : admin@mucbf.com • Web : www.mucbf.com


परिपत्रक: एमयुसीबीएफ/ ३७/१०/२०१५-१६
दिनांक: १ जानेवारी, २०१६

प्रति,
**मा.अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व प्राथमिक नागरी सहकारी बँका

विषय: नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात आलेल्या 'एकरकमी कर्ज परतफेड योजनेस' मुदतवाढ मिळणेबाबत.
संदर्भ: मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.१७/१२/२०१५ रोजीचे पत्र

**महोदय,**

आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात येणाऱ्या शासनाच्या 'एकरकमी कर्ज परतफेड योजनेस मुदतवाढ मिळण्यासाठी' फेडरेशनकडून मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि.५ मे,२०१५, दि.११ जुलै,२०१५, दि.१५ सप्टेंबर,२०१५ व दि.१६ नोव्हेंबर, २०१५ रोजी पत्रव्यवहार करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे जा.क्र.ना.बँका/डी-४/ओटीएस /मुदतवाढ/२०१५/५०५५ दि.१७/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये 'महाराष्ट्रातील किती नागरी सहकारी बँकांनी शासनाची एकरकमी कर्ज परतफेड योजना स्वीकारली आहे? या योजनेअंतर्गत किती बँकांची एनपीए खाती कमी झाली व किती रक्कमेची वसुली झाली आहे? तसेच अजून किती खात्यावर कार्यवाही चालू आहे? याबाबतची सविस्तर माहिती संकलित करुन मा.सहकार आयुक्त कार्यालयास सत्वर सादर करावी' असे फेडरेशनला कळविले आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरलिखीत पत्रान्वये सादर करावयाची खालीलप्रमाणे माहिती आपण फेडरेशनच्या कार्यालयाकडे तातडीने पाठवावी, जेणेकरुन सदरची माहिती मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करणे फेडरेशनला सोईचे होईल.

१) आपल्या बँकेने सन २०१४-२०१५ या कालावधीकरिता एकरकमी कर्ज परतफेड योजना स्वीकारली होती का?
२) सदर योजना स्वीकारली असल्यास त्याद्वारे आपल्या बँकेची किती एनपीए खाती कमी झाली व संबंधीत खात्यात गतवर्षी किती रक्कमेची वसुली झाली?
३) आजमितीस किती खात्यांवर कार्यवाही करणे बाकी आहे?

यासंबंधाने मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या संदर्भिय पत्राची छायांकित प्रत आपले माहितीसाठी यासोबत जोडीत आहोत. तरी कृपया त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी ही विनंती.

कळावे.

आपली विश्वासू

सायली भोईर

**सौ. सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव

सोबत: वरीलप्रमाणे.


Chairman
Vidyadhar Anaskar
M.Com., D.T.L. & LW., LL.B.
Bank : 020 - 24481883 / 24477748 / 49

Vice-Chairman
Shri Ajay Bramhecha
Bank : 02550 - 266058 / 266231
Office : 0253 - 2572029

Chief Executive & Secretary
Sou. Sayali Bhoir
B.Com., G.D.C. & A.,
LL.B., C.A.I.I.B.